# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org


क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३६०/प्रनिप्रा/३१ऑक्टोबर/२०२४/6226 दिनांक : 06 NOV 2024

**बैठकीचे इतिवृत्त**

**मा. न्या. वि.एल. अचलिया (से.नि.) (अतिरिक्त कार्यभार), अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, <u>दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२४ रोजी दुपारी १२:०० वा.</u> झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त,-

सदरील बैठकीस प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व २) श्री. दिलीप सरदेसाई (भा.प्र.से.), सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. व श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे हे अनुपस्थित होते.

श्री. सिध्देश नर, परिक्षा समन्वयक वैद्यकीय / आयुष शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

<u>विषय क्रमांक १</u> : <u>प्राधिकरणाच्या दिनांक २५/१०/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.</u>

मान. प्राधिकरणाच्या दिनांक २५/१०/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार ज्या तक्रारकर्त्यांच्या तक्रारींवर प्राधिकरणाने नियमानुसार कार्यवाही करुन रुजू करुन घेण्याकरिता मूदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार खालील विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना नियम व गुणवत्तेनुसार प्रवेश प्रदान केले, त्यामुळे सदरील तक्रारी निकाली काढण्याचे ठरविण्यात आले.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | तक्रार/निवेदन सादर करणाऱ्याचे नाव | अभ्यासक्रम | प्रवेश दिलेल्या महाविद्यालयाचे नाव | प्रवेशाची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| १. | कु. श्रेया बिपीन टावरी | एम.बी.बी.एस. | परभणी मेडीकल कॉलेज, परभणी | दिनांक २६/१०/२०२४ रोजी प्रवेश झालेला आहे. |
| २. | कु. हर्षद जाधव | एम.बी.बी.एस. | डॉ.उल्हास पाटील मेडीकल कॉलेज, जळगांव | दिनांक २६/१०/२०२४ रोजी प्रवेश झालेला आहे. |
| ३. | कु. दृष्टी राजेश तुपकर | एम.बी.बी.एस. | प्रकाश इन्स्टिटयूट ऑफ मेडीकल सायन्स ॲन्ड रिसर्च, सांगली | प्रवेश झालेला आहे. |
| ४. | कु. खुशबु मुख्तार मन्सुरी | एम.बी.बी.एस. | जे.आय.आय.यु.चे वैद्यकीय महाविद्यालय, जालना | दिनांक २४/१०/२०२४ रोजी प्रवेश झालेला आहे. |
| ५. | कु. आबिद उस्मानी | एम.बी.बी.एस. | गुरु मिश्री होमिओपॅथीक महाविद्यालय, जालना | दिनांक २८/१०/२०२४ रोजी प्रवेश झालेला आहे. |
| ६. | कु. तनिक्षा एस. | बी.एम.एम.एस. | डॉ.व्ही.पाटील आयुर्वेदिक कॉलेज, शेवगाव, अहमदनगर | प्रवेश झालेला आहे. |
| ७. | कु. रितेश कठार | बी.एम.एम.एस. | श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज, संभाजीनगर | दिनांक २८/१०/२०२४ रोजी प्रवेश झालेला आहे. |

तथापि ज्या प्रकरणी तक्रारकर्त्यांच्या तक्रारीस अनुसरुन तसेच प्राधिकरणाच्या निर्णयानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना विहित कालावधीमध्ये रुजू करुन घेण्याकरिता विद्यार्थ्यांना प्रवेशाकरिता सर्व आवश्यक माहिती/प्रमाणपत्र व शुल्कासह रुजू होण्याबाबत कळविले परंतू संबंधित विद्यार्थी महाविद्यालयामध्ये हजर झालेले नाही, असे महाविद्यालयांकडून कळविण्यात आले आहे. अशा प्रकरणी महाविद्यालयांनी सादर केलेल्या त्यांच्या अहवालाची शहानिशा करणे क्रमप्राप्त ठरते. याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे,-

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | तक्रार/निवेदन सादर करणाऱ्याचे नाव | अभ्यासक्रम | महाविद्यालयाचे नाव | प्रवेशाची सद्यस्थिती / महाविद्यालयाने सादर केलेले अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | कु. तन्मय शैलेश जाजु | एम.बी.बी.एस. | परभणी मेडीकल कॉलेज, परभणी | विद्यार्थी दिनांक २७/१०/२०२४ रोजी सांय ०५:३० पर्यंत प्रवेशासाठी हजर राहिला नाही. |
| २. | अंशिथा संजय जैन | एम.बी.बी.एस. | ए.सी.पी.एम. मेडीकल कॉलेज, धुळे | विद्यार्थी दिनांक २७/१०/२०२४ रोजी सांय ०५:३० पर्यंत प्रवेशासाठी हजर राहिला नाही. |
| ३. | सुहानी यादव | एम.बी.बी.एस. | परभणी मेडीकल कॉलेज, परभणी | विद्यार्थी दिनांक २७/१०/२०२४ रोजी सांय ०५:३० पर्यंत प्रवेशासाठी हजर राहिला नाही. |
| ४. | सार्थकी जितेंद्र तरमाले | एम.बी.बी.एस. | तेरणा दंत महाविद्यालय, मुंबई | विद्यार्थी दिनांक २७/१०/२०२४ रोजी सांय ०५:३० पर्यंत प्रवेशासाठी हजर राहिला नाही. |
| ५. | अन्सारी तश्वीब फातीमा शकिल अहमद | एम.बी.बी.एस. | सिंधूदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळ मेडीकल कॉलेज, कुडाळ, सिंधुदूर्ग | विद्यार्थी दिनांक २७/१०/२०२४ रोजी सांय ०५:३० पर्यंत प्रवेशासाठी हजर राहिला नाही. |
| ६. | राठोड विनोद अनिलराव | एम.बी.बी.एस. | तेरणा वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | विद्यार्थी दिनांक २७/१०/२०२४ रोजी सांय ०५:३० पर्यंत प्रवेशासाठी हजर राहिला नाही. |
| ७. | अश्विन शेटे | बी.ए.एम.एस | इंदुताई गायकवाड पाटील आयुर्वेद, कॉलेज, नागपूर | विद्यार्थी विहित कालावधीमध्ये प्रवेशासाठी उपस्थित नव्हता. |

याकरिता ज्या प्रकरणी विद्यार्थी (तक्रारकर्ता) अनुपस्थित / गैरहजर असल्याचे कळविण्यात आले आहे, अशा प्रकरणी महाविद्यालयाच्या सदरील पत्राची प्रत सदरील तक्रारीकर्त्यांना कळवून त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात प्राप्त करुन घेण्याबाबत सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुकत व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये सादर करावा, तद्नंतर सदरील प्रकरणे निकाली काढण्यात येईल, असे ठरविण्यात आले.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
मुंबई, महाराष्ट्र राज्य

<u>विषय क्रमांक २:</u> <u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर आरोग्य विज्ञान व आयुष अभ्यासक्रमास प्रवेशित परंतू प्राधिकरणाची मान्यता प्रदान न झाल्यामुळे विद्यापीठाद्वारे होणाऱ्या परिक्षेस बसण्यास तसेच परिक्षेचा निकाल जाहिर करण्याबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ मधील आरोग्य विज्ञान व आयुष अभ्यासक्रमांच्या ज्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली नव्हती, अशा प्रकरणी संबंधित विद्यार्थ्यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या परिक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येत नसल्याचे तसेच परिक्षेचे निकाल राखुन ठेवल्याचे संबंधित महाविद्यालयांनी प्राधिकरणास कळविले आहे. तद्नुषंगाने परिक्षेचे निकाल जाहिर करण्याबाबत महाविद्यालये आणि विद्यार्थी / पालक यांच्याकडून वारंवार विचारणा करण्यात येत आहे.

तथापि प्रस्तूत प्रकरणी ज्या महाविद्यालयांनी परिक्षेचे निकाल जाहिर करण्यास अथवा परिक्षेचे अर्ज स्वीकारुन पुढील परिक्षेस बसण्यास लेखी स्वरुपात प्राधिकरणास निवेदने वजा विनंती अर्ज सादर केलेली आहेत, फक्त अशाच महाविद्यालयांतील <u>(प्रपत्र-अ)</u> प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी विद्यापीठाद्वारे परिक्षेचे निकाल जाहिर करण्यास अथवा परिक्षेचे अर्ज स्वीकारुन पुढील परिक्षेस बसण्यास प्राधिकरणाच्या अंतिम मान्यतेस अधीन राहून परवानगी प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्राधिकरणाच्या निर्णयानुसार या संदर्भात उचित कार्यवाही करण्याकरिता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुकत व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी स्वतंत्र पत्राद्वारे महाविद्यालयांच्या यादीसह कळवावे.

<u>विषय क्रमांक २:</u> <u>मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.</u>

निरंक

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(न्या. वि.एल. अचलिया (से.नि.))
अध्यक्ष,
(अतिरिक्त कार्यभार)
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 06/11/2024